### ग्रंथमालिका ‘बालसंस्कार’ : खंड १

# सुसंस्कार आणि चांगल्या सवयी

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**पू. संदीप गजानन आळशी**



## सनातन संस्था



**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४१, इंग्रजी २०१, कन्नड १९६, हिंदी १९५, गुजराती ६८, तेलुगु ४५, तमिळ ४३, बंगाली २९, मल्ल्याळम् २३, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**सप्टेंबर २०२३ पर्यंत ३६२ ग्रंथांच्या १३ भाषांत ९४ लाख ३५ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून १८.१०.२०२३ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०४६ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन!

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देह असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥ – जयंत बाळाजी आठवले

१५.५.१९९६

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## ग्रंथाची अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | सुसंस्कार का आवश्यक असतात ? | ९ |
| २. | रात्री लवकर निजून सकाळी लवकर उठावे ! | ११ |
| ३. | देवाची पूजाअर्चा आदी उपासना करावी ! | १२ |
| ४. | घरातील मोठ्या व्यक्तींना वाकून नमस्कार करावा ! | १४ |
| ५. | आई-वडिलांशी कसे वागावे ? | १५ |
| ६. | पाहुण्यांचे स्वागत आणि आदरातिथ्य कसे करावे ? | १९ |
| ७. | शालेय साहित्य कसे असावे ? ते कसे हाताळावे ? | २१ |
| ८. | शाळेला विद्येचे मंदिर समजून आदर्शरित्या वागावे ! | २५ |
| ९. | हस्ताक्षर वळणदार आणि सुवाच्य काढावे ! | ३० |
| १०. | वाचन करतांना कोणती काळजी घ्यावी ? | ३२ |
| ११. | अभ्यास चांगला होण्यासाठी काय करावे ? | ३३ |
| १२. | 'कॉपी', 'रॅगिंग' आदी कुप्रथांपासून दूर रहा ! | ३४ |
| १३. | परीक्षेतील अपयशामुळे आत्महत्येचा विचार करणे, हा वेडेपणा ! | ३६ |
| १४. | अवांतर वाचन कोणते करावे ? | ३८ |

१५. शरीरसंपदा निरोगी राखण्यासाठी काय करावे ? ४५

१६. कोणते खेळ खेळू नयेत आणि कोणते खेळ खेळावेत ? ४६

१७. कोणते छंद जोपासावेत ? ५०

१८. मुलांनो, नेहमी चांगल्या सवंगड्यांच्या संगतीतच रहा ! ५६

१९. मुलांनो, तुमचे आदर्श कोण असावेत ? ६०

२०. सुसंस्कारित होण्यासाठी ‘टी.व्ही.’ला दूर ठेवा ! ६६

२१. देवभक्ती अन् राष्ट्रभक्ती वाढवणारी गीते ऐकावीत ! ७३

२२. मुलांनो, या चांगल्या सवयीही बाणवा ! ७७

卐 प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या ! ७९


## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या ‘सच्चिदानंद परब्रह्म’ या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये ‘प.पू.’ आणि ‘परात्पर गुरु’ या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

---

## सनातनच्या दोन सद्गुरूंच्या नावांच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ’ असे संबोधले जात आहे. या संतद्वयी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत.

## मनोगत



आजचे बालक हे उद्याचे देशाचे आधारस्तंभ आहेत. देशाचे आधारस्तंभ होण्यासाठी बालक गुणसंपन्न आणि आदर्श असायला हवेत. आजच्या बालकांची स्थिती कशी आहे ? कित्येक मुले मोठ्यांचे ऐकत नाहीत, अभ्यास मन लावून करत नाहीत आणि शिक्षकांची टवाळी करतात. अनेक मुले घंटोन्‌घंटे (तासन्‌तास) क्रिकेट खेळतात किंवा दूरचित्रवाणी पहातात. काही जण मोठेपणी चित्रपट-कलाकार बनण्याचे ध्येय ठेवून सतत चित्रपटांतील गाणी गुणगुणत असतात. काहींना वाईट मुलांची संगत लागलेली असते, तर काही जण मावा, गुटखा आदींच्या आहारी गेलेले असतात. या सर्वांमुळे मुले स्वार्थी, चिडखोर, हट्टी, चंचल आणि विकृत बनत आहेत. हे सर्व थांबवण्यासाठी मुलांवर सुसंस्कार करणे आवश्यक बनले आहे.

या ग्रंथात वाईट संस्कारांमुळे होणारे दुष्परिणाम, तसेच चांगले संस्कार आणि सवयी यांचे महत्त्व अन् लाभ सांगितले आहेत. त्यामुळे मुलांना चांगल्या आणि वाईट गोष्टी यांतील भेद (फरक) कळेल. मुलांनी अभ्यास कसा करावा, कोणते छंद जोपासावेत, गुरुजनांशी कसे वागावे, पाहुण्यांचे स्वागत कसे करावे आदी सूत्रांमुळे मुले जीवनात यशस्वी बनण्यासह गुणी अन् आदर्शही बनतील.

मुलांच्या संदर्भातील काही गोष्टींविषयी पालकांनी ठेवायचा दृष्टीकोन, त्यांनी मुलांकडून करवून घ्यायचे प्रयोग आदींचाही समावेश ग्रंथात आहे.

सुसंस्कारित, धर्माचरणी आणि राष्ट्रभक्त अशी भावी पिढी निर्माण होण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त ठरो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**